पुणे शहर पोलीस

# दर्पण

## जानेवारी २०२०

# कारवाई

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०२ जानेवारी, २०२०

# साडेचारशे तळीरामांवर 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ची कारवाई

## दुचाकीस्वारांची संख्या अधिक; पाच लाखांचा दंड वसूल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नववर्षाच्या पूर्वसंध्येला शहरात मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या ४६० वाहनचालकांवर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली. कारवाई केलेल्यांमध्ये दुचाकीचालकांची संख्या जास्त असून, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबरच्या रात्री कोणताही अपघात घडला नसल्याचेही पोलिसांकडून सांगण्यात आले. मद्यपींवर सर्वाधिक कारवाई कोरेगाव पार्क परिसरात कारवाई करण्यात आली आहे.

> शहरात ३१ डिसेंबरच्या रात्री मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर कारवाईसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यासाठी चौकाचौकात बंदोबस्त लावण्यात आला होता. मद्यपान करून वाहने चालवू नका, असे आवाहनही करण्यात आले होते. मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या ४६० जणांवर कारवाई केली आहे. नवीन वर्षाचा जल्लोष करताना शहरात अपघात आणि इतर अनुचित प्रकार घडलेला नाही.
>
> – डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलिस आयुक्त

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले होते. मद्यपान करून वाहने चालवू नका, अशा सूचनाही पोलिसांनी दिल्या होत्या.

अमित रुके



'ड्रंक अँड ड्राइव्ह'अंतर्गत सेनापती बापट रस्त्यावर वाहनचालकांची तपासणी करताना पोलिस.

### एक हजार जणांवर कारवाई

मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर गेल्या तीन दिवसांपासून कारवाई सुरू आहे. या तीन दिवसांमध्ये एक हजारपेक्षा जास्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, 'नो एंट्री'तून येणाऱ्यांवरदेखील कारवाई केली जात आहे. यामध्ये ३१ डिसेंबरच्या रात्री १४०० जणांवर कारवाई करून पाच लाख ११ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

३१ डिसेंबरच्या रात्री हॉटेलांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी सर्वत्र नाकाबंदी केली होती.

३१ डिसेंबरच्या रात्री शहरात ७४ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती. या मोहिमेत ६१ अधिकारी आणि ६४८ कर्मचाऱ्यांची फौज विविध ठिकाणी तैनात करण्यात आली होती. नाकाबंदीच्या ठिकाणी 'ब्रेथ ॲनालायझर'च्या मदतीने वाहनचालकांची तपासणी केली जात होती. या कारवाईत मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या ४६० वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. पैकी ३१४ दुचाकीचालक असून, १२२ चारचाकीचालक आणि २४ तीनचाकीचालक आहेत. शहरात मद्यपींवर सर्वाधिक कारवाई कोरेगाव पार्क परिसरात कारवाई करण्यात आली. त्यानंतर वानवडी, कोंढवा, सिंहगड रस्ता, वारजे, शिवाजीनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. गुन्हे दाखल झालेल्यांना चारित्र्य पडताळणी आणि नोकरीसाठी अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ जानेवारी, २०२०

# एकशे अकरा कोटींचा दंड वसूल

## विनाहेल्मेट वाहनचालकांवर पोलिसांकडून सर्वाधिक कारवाई



म. टा. प्रतिनिधी, पुणे

वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून, नियम तोडणाऱ्या २७ लाख ५९ हजार २२९ वाहनचालकांवर कारवाई करून, वाहतूक पोलिसांनी त्यांच्याकडून तब्बल १११ कोटी ७४ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. गेल्या वर्षभरात ही कारवाई करण्यात आली असून, सर्वाधिक दंड हेल्मेट न घातल्याने वसूल करण्यात आला आहे. विना हेल्मेट गाडी चालविणाऱ्यांकडून पोलिसांनी सुमारे १७ लाख पाच हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखा पोलिसांनी २०१९ या वर्षाचा आपला अहवाल नुकताच सादर केला आहे. या अहवालानुसार वेगिल्ल वाहनचालकांवर वाहतूक नियमभंगाच्या केस दाखल करण्यात आल्या आहेत. पोलिस आयुक्तालयाच्या २४ वाहतूक विभागांतर्गत व सीसीटीव्हीच्या माध्यमातून वाहतूक पोलिसांनी ही कारवाई केली आहे. रस्त्यांवरून वाहने चालवताना नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्ही आणि ई-चलन डिव्हाइस मशिनद्वारे कारवाई करण्यात आली. यासाठी विशेष मोहिमादेखील राबविण्यात आल्या.

**पोलिसांनी केलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे**

| नियमाचे उल्लंघन | एकूण केसेस |
|---|---|
| विना हेल्मेट | १७ लाख ५ हजार ११५ |
| नो-पार्किंग | ३ लाख २३ हजार ०७४ |
| विना परवाना वाहन चालविणे | २० हजार ७११ |
| झेब्रा क्रॉसिंगपुढे थांबणे | ५९ हजार १३१ |
| मोबाइल बोलत वाहन चालविणे | १९ हजार २११ |
| बेदरकार वाहन चालविणे | १२ हजार ०२६ |
| विरुद्ध दिशेने वाहने चालविणे | ४७ हजार १३२ |
| नो एंट्री | ३५ हजार १०६ |
| ट्रिपल सीट | १६ हजार ८०० |
| लायसन्स जवळ न बाळगणे | १ लाख १९ हजार ७८१ |
| इतर | ३ लाख १८ हजार ७०८ |

रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी केलेल्या जनजागृतीमुळे पुणे पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या अपघातांमध्ये घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ही संख्या कमी होत आहे. २०१७-२०१८ या वर्षात २४० प्राणांतिक अपघातात २५३ नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर २०१८-२०१९ मध्ये १९९ प्राणांतिक अपघातात २०६ नागरिकांचा मृत्यू झाला.

सुरक्षित आणि सुरळीत वाहतूक हे ध्येय ठेवून, चालू वर्षात रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण किमान ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट वाहतूक पोलिसांनी ठेवले असून, त्यासाठी नियमांची कडक अंमलबजावणी केली जाणार असल्याचे वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**लोकमत** – दि. ९ जानेवारी, २०२०

# सव्वा कोटीची फसवणूक; तिघांना अटक

## १४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : स्टील खरेदीचे कारण सांगून आरटीजीएसद्वारे अर्धवट रक्कम बँक अकाऊंटवर टाकून उर्वरीत पैसे न देता सव्वा कोटीची फसवणूक करणाऱ्या तिघांना सायबर पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्यांना १४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

सादिक शरीफ अजमद शरिफ (रा. १२५, बार टू, एटीन क्रॉस, शांतीनगर, म्हैसूर), सफीर अहमद नजीर अहमद (रा. कल्याणीगिरी, म्हैसूर), मोहमद अलिम खान (बंगळुरु) अशी अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे आहेत. गौरव बन्सीधर गुप्ता (वय २७, रा. महंमदवाडी) यांनी फिर्याद दिली. या घटनेत यापूर्वी संतोष शिवाप्पा चन्नाबसप्पा (वय ३१, रा. कर्नाटक), संदेश सत्यनारायण सिंधे (वय ३४, रा. म्हैसूर) यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. याबरोबरच सलीम पाशा आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींचा शोध सुरु आहे. इतर साथीदारांचा शोध घेऊन त्यांना अटक करणे, अटक आरोपींकडून स्टील कुठे ठेवले आहे याचा शोध घेऊन त्याबाबत तपास करुन मुद्देमाल जप्त करणे, याकरिता सरकारी वकिलांनी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

◆ १० जून ते १८ नोव्हेंबरदरम्यान ही घटना घडली. आरोपी यांनी फिर्यादी यांच्याशी संपर्क साधून स्टील खरेदीचे कारण सांगून ३०८ टनचे स्टील विकत घेतले. त्यानंतर फिर्यादी यांच्या बँक खात्यावर ३७ लाख ७४ हजार ६४३ रुपयांचे आरटीजीएस मार्फत भरणा केला. मात्र फिर्यादी यांना उर्वरीत १ कोटी १३ लाख २३ हजार ९२९ रुपयांची रक्कम न देता त्यांची फसवणूक केली.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २६ जानेवारी, २०२०

# बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्यास अटक

पुणे : बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या व्यक्तीला अलंकार पोलिस ठाण्याच्या हद्दीतून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक पिस्तूल व दोन काडतुसे जप्त केली आहेत.

दिनेश ढवळे (वय २२, रा. साईनगर, हिंगणे खुर्द) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेचे पथक अलंकार पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्या वेळी दिनेश ढवळे सृष्टी गार्डन समोरील रस्त्याजवळ पिस्तूल घेऊन थांबला असल्याची खबर पोलिस कर्मचारी नितीन रावळ व कैलास साळुंके यांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने ढवळे यास अटक केली. त्याची झडती घेतल्यानंतर त्याच्याकडे गावठी पिस्तूल व दोन जीवंत काडतुसे असा ४५ हजार रुपयांचा ऐवज आढळून आला.

लोकमत – दि. १ जानेवारी, २०२०

# नोकरीच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्यांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नोकरी आणि गुंतवणुकीवर आकर्षक परतावा देण्याच्या आमिषाने फसवणूकप्रकरणी सिंहगड रोड पोलिसांनी आणखी दोघांना अटक केली. आतापर्यंत ३१ गुंतवणूकदाराची १४ लाख १९ हजार ५६५ रुपयांची फसवणूक झाल्याचे या प्रकरणात निष्पन्न झाले आहे. अविनाश प्रकाश जाधव (वय २७, रा. हडपसर) व सुनील बाबूराव जोशी (वय २६, रा. हडपसर, मूळ कोल्हापूर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

अभिजित अर्जुन सुतार (वय २३, रा. सांगली) याला यापूर्वी अटक झालेली आहे. तर, आणखी दोघांवर गुन्हा दाखल आहे. ही घटना सिंहगड रोडवरील स्कायरनवे प्रा. लि. या कंपनीत २९ डिसेंबर २०१७ पासून आतापर्यंतच्या कालावधीत घडली आहे. या कंपनीच्या माध्यमातून सोशल मीडियावर जाहिरात करुन तसेच माऊथ टू माऊथ पब्लिसिटी करुन तरुणांना नोकरीची आमिषे दाखविण्यात आले. अनेकांना नोकरीसाठी म्हणून प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये गुंतवणूक केल्यावर आकर्षक परतावा देण्याच्या आमिषाने फसवणूक करण्यात आली आहे. सिंहगड रोड पोलिसांनी दोघांना अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले. त्या वेळी अधिक तपासासाठी दोघांना पोलीस कोठडी देण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील जावेद खान यांनी केली.

लोकमत – दि. १४ जानेवारी, २०२०

# उल्हासनगरमधील खुनातील फरार आरोपी पुण्यात जेरबंद

## दोन महिन्यांनंतर अटक : गुन्हे शाखेच्या युनिट ४ पथकाची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** उल्हासनगर येथे गोळ्या झाडून खून केल्यानंतर दोन महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला गुन्हे शाखेच्या युनिट ४ च्या पथकाने जेरबंद केले आहे.

आफताब ऊर्फ सलीम महंमद खलिफ शेख (वय २७, रा. उल्हासनगर) असे या आरोपीचे नाव आहे. आफताब शेख याने पूर्ववैमनस्यातून त्याचा मित्र भरत ऊर्फ सोन्या चंद्रकांत लष्करे याचा इतर मित्रांच्या मदतीने पिस्तुलातून गोळी झाडून व कोयत्या गळ्यावर वार करुन खून केला होता. त्यानंतर तो गेले दोन महिने दिल्ली, अजमेर, आझमगड, हैदराबाद या ठिकाणी वास्तव्य करत होता.

तो सातत्याने ठिकाण बदलत असल्याने उल्हासनगर पोलिसांच्या हाताला लागत नव्हता. पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांना आफताब शेख हा खराडी बायपास येथे येणार असल्याची माहिती १२ जानेवारी रोजी मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक गणेश पवार, सहायक फौजदार अब्दुल करीम सय्यद, हवालदार गणेश साळुंके, सुरेंद्र साबळे, राकेश खुनवे यांनी खराडी बायपास येथे सापळा लावला होता.

सोमवारी १३ जानेवारीला पहाटे सव्वातीनच्या सुमारास नगर रोडवरील हॉटेल सागर येथे शेख आला असताना पोलिसांनी त्याला पकडले. पुढील तपासासाठी शेख याला विठ्ठलवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

लोकमत – दि. १९ जानेवारी, २०२०

# कोयत्याचा धाक दाखवून लुटणारे अटकेत

पुणे : कोयत्याचा धाक दाखवून तरुणीचा मोबाइल व पिशवी चोरणाऱ्या आणखी दोघांना डेक्कन पोलिसांनी अटक केली आहे.

राकेश जॉन सकट (वय १९), किरण रमेश गालफाडे (वय २१, दोघेही रा. मंगळवार पेठ) असे अटक करण्यात आलेल्यांचे नाव आहे. या प्रकरणी यापूर्वी उबेद सलीम शेख याला अटक करण्यात आली होती. प्राची रमेश बजानिया (वय ३१, रा. गुजरात) यांनी फिर्याद दिली आहे. सदर घटना २५ नोव्हेंबर रोजी लॉ कॉलेज रस्त्यावर पहाटे तीनच्या दरम्यान घडली होती.

घटनेच्या दिवशी फिर्यादी लॉ कॉलेज रस्त्यावरून जात होत्या. या वेळी शेख याने आपल्या साथीदाराच्या मदतीने कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्याकडील मोबाइल हिसकावून घेतला. त्याचबरोबर त्यांच्याकडील पिशवीदेखील चोरली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २४ जानेवारी, २०२०

# महिलेचा मोबाइल हिसकाविणारा अटकेत

पुणे : प्रभात रस्ता परिसरात पादचारी महिलेचा मोबाइल हिसकाविणाऱ्या चोरट्याला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून चोरीचा मोबाइल जप्त करण्यात आला आहे.

महंमद फिरोज खान (वय २४, रा. विष्णुकृपानगर, शिवाजीनगर रेल्वे स्थानकाजवळ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. प्रभात रस्ता परिसरात वीस दिवसांपूर्वी खानने रात्री घरी जात असलेल्या एका महिलेचा मोबाइल हिसकावून नेला होता. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेच्या युनिट एककडून करण्यात येत होता. चोरटा शिवाजीनगर भागातील महात्मा गांधी वसाहत येथे थांबला असल्याची माहिती पोलिस हवालदार योगेश जगताप यांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक अरुण वायकर यांच्या पथकाने खानला पकडले. त्याच्याकडून मोबाइल जप्त केला.

तसेच, शिवाजी रस्त्यावर पादचाऱ्याच्या पिशवीतील मोबाइल चोरल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी नीलेश अराळकर (वय ४२, रा. यमुनानगर, निगडी) यांनी विश्रामबाग ठाण्यात तक्रार दिली आहे.

लोकमत – दि. १७ जानेवारी, २०२०

# दुकानदाराला लुटणाऱ्यांना केली अटक

पुणे : किराणा दुकानदाराला मारहाण करून लुटत असताना गस्त घालणारी पोलीस व्हॅन तेथे पोहचल्याने चोरट्यांपैकी एकाला पोलिसांनी जागेवरच पकडले. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी दोघांना अटक केली. संतोष विलास मोरे (वय ३८) व सागर मोहन जाधव (वय २६, दोघे रा. नऱ्हे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी सोहनलाल अगरवाल (वय ४०, रा. मोहननगर, चिंचवड) यांनी कोंढवा पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. ही घटना उंड्री येथील संस्कृती स्कूलसमोरील रोडवर १४ जानेवारीला रात्री साडेदहा वाजता घडली होती. सोहनलाल यांचे उंड्रीत किराणा मालाचे दुकान आहे. ते दुकान बंद करून दिवसभराची जमा झालेली ४० हजार रुपयांची रोकड घेऊन दुचाकीवरुन घरी जात होते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ६ जानेवारी, २०२०

# बनावट चेक देणारा 'खरेदीदार' अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पैसे नसलेल्या खात्याचे चेक देऊन नागरिकांचे मोबाइल 'खरेदी' करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. 'ओएलएक्स'वर मोबाइल विक्रीसाठी टाकलेल्या व्यक्तींना हेरून त्यांचीशी संपर्क साधत गंडा घालत असल्याचे समोर आले आहे. या आरोपींनी पूर्वी सात जणांची अशा पद्धतीने फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

राहुल अरुण सिद्ध (वय ४२, रा. ससाणेनगर, हडपसर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याच्यावर नगरमधील भिंगार, नेवासा, शिर्डी, एमआयडीसी पोलिस ठाण्यात अशाच पद्धतीने फसवणूक केल्याचे सात गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. तक्रारदार हृषिकेश सोमसे या तरुणाने त्याचा मोबाइल ओएलएक्सवर विक्रीसाठी टाकला होता. त्या वेळी आरोपी सिद्धने त्याला संपर्क साधला. त्याचा मोबाइल खरेदी करायचा असल्याचे सांगितले. त्यानुसार घोरपडी गाव येथे त्याला भेटण्यासाठी बोलविले. भेटल्यानंतर आरोपीने तो आर्मीमध्ये असल्याचे तक्रारदार याला सांगितले. त्याचा मोबाइल घेऊन त्याला पैसे नसलेल्या बँक खात्याचा चेक दिला. तक्रारदार यांनी तो चेक आपल्या बँकेत जमा केला असता तो वटला नाही. त्यामुळे त्यांनी वानवडी पोलिसांकडे तक्रार दिली होती.

गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस कर्मचारी अमोल पवार यांना माहिती मिळाली, की 'ओएलएक्स'वरील नागरिकांचे मोबाइल लंपास करणारा आरोपी हा ससाणेनगर येथे आहे. त्यानुसार अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक अरुण वायकर यांच्या पथकाने सिद्ध याला पकडले. त्याला अटक करून कोर्टात हजर केले असता कोर्टाने सात जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

# ८, ७३४ वाहनचालकांना वाहतूक विभागाचा दणका

## एका दिवसात ४० लाख ३० हजारांचा दंड वसूल

**पुणे : प्रतिनिधी**

वाहतूक पोलिसांकडून शहरात नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात सातत्याने कारवाई करण्यात येते. त्यांच्याकडून नियमभंग प्रकरणी दंडही वसूल करण्यात येतो. सोमवारी वाहतूक विभागाने विशेष मोहिम हाती घेऊन सुमारे ८ हजार ७३४ वाहनचालकांवर धडक कारवाई केली आहे. एकाच दिवसात करण्यात आलेल्या या कारवाईतून वाहतूक विभागाने सुमारे ४० लाख ३० हजारांचा दंड वसूल केला असल्याची माहिती वाहतूक विभागाकडून देण्यात आली.

सर्रास वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. त्यामध्ये विना हेल्मेट दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करुन १९ लाख ३३ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. तर नो पार्कींगमध्ये वाहने उभी केलेल्या २ हजार १०२ चालकांवर कारवाई करुन ४ लाख २० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

पुणे शहरातील २४ वाहतूक विभागातंर्गत विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, प्रवाशी वाहतूक करताना ड्रेसकोड न वापरणे, नो पार्कींग, विना हेल्मेट दुचाकीस्वार, झेब्रा क्रॉसिंग, सिग्नल तोडणे, लायसन्स न बाळगणे, विना सिट बेल्ट मोटार चालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यात आला.




> सर्रास नियमभंग वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. त्यामोहिमेनुसार शहरातील प्रत्येक वाहतूक विभागातंर्गत ८ हजारांवर बेशिस्त चालकांवर कारवाई करुन तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. सीसीटीव्ही आणि मॅन्युअली कारवाई करण्यात आली. बेशिस्तांविरुद्ध कारवाईचा वेग कायम ठेवला जाणार आहे.
>
> - डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, वाहतूक

### विशेष मोहिमेतंर्गत एकाच दिवसातील कारवाई

| एकूण कारवाई | तडजोड | वसूल शुल्क |
|---|---|---|
| लायसन्स न बाळगणे | ८९२ | १ लाख ७८ हजार |
| राँग साईड ड्रायव्हिंग | १७९ | १ लाख ७९ हजार |
| नो पार्कींग - | २ हजार १०२ | ४ लाख २० हजार |
| सिग्नल तोडणे | ६३२ | १ लाख २६ हजार |
| विना युनिफॉर्म | १२४ | २४ हजार ८०० |
| विना सीटबेल्ट | १४० | २८ हजार |
| विना हेल्मेट | ३ हजार ८६६ | १९ लाख ३३ हजार |
| झेब्रा क्रॉसिंग | ६९९ | १ लाख ३९ हजार |

एकूण वाहनचालक ८ हजार ७३४, वसूल दंड- ४० लाख ३० हजार

# अमेरिकन डॉलरची चोरी करणारा गजाआड

## १२ हजार डॉलर केले एक्स्चेंज : गुन्हे शाखा युनिट २ कडून अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अमेरिकन डॉलर पाहिजे, असे सांगून फॉरेन एक्स्चेंज कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने डॉलरची चोरी करणाऱ्यास गुन्हे शाखा युनिट २ कडून अटक करण्यात आली. त्याच्याकडून एकूण १२ हजार अमेरिकन डॉलर जप्त करण्यात आले आहेत. पुण्याबरोबरच हैदराबाद येथे देखील आरोपीने डॉलरच्या नावाखाली फसवणूक केल्याचे दिसून आले. यानंतर युनिट २ ने त्याला हैदराबाद येथून ताब्यात घेतले.

राहुल किरण गाटीया (वय ३१, रा. नेपीयन सी रोड, शांतीनगर, मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. नोव्हेंबर २०१९ मध्ये कोरेगाव पार्क व येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत डॉलरच्या नावाने फसवणुकीच्या घटना घडल्या होत्या. या गुन्ह्याचा तपास करीत असताना तशाच प्रकारचे गुन्हे त्याने हैदराबाद येथे केल्याची माहिती युनिट २ चे प्रभारी अधिकारी महेंद्र जगताप यांना मिळाली. आरोपी गुन्हा करताना प्रथम बनावट नावाने सर्व्हिस अपार्टमेंट बुक करत होता. नंतर फॉरेन एक्स्चेंजमध्ये पाच ते सात हजार अमेरिकन डॉलरची मागणी करून त्यांना आपल्या सर्व्हिस अपार्टमेंटमध्ये बोलावत असे. यावेळी तो डॉलर मोजण्याच्या बहाण्याने ते ताब्यात घेऊन फॉरेन एक्स्चेंजच्या एजंटच्या डोळ्यावर पेपर स्प्रे मारायचा व त्याला धक्का देऊन डॉलर घेऊन रूमचा दरवाजा बंद करुन पळून जात असे.

आरोपीने पुन्हा हैदराबादमध्ये पुन्हा फोनवरुन एका फॉरेन एक्स्चेंजमधून ७ हजार डॉलरची मागणी केली. तसेच संबंधिताला सर्व्हिस अपार्टमेंटमध्ये डिलीव्हरी देण्यास सांगितले. यावेळी हैदराबाद पोलिसांनी आरोपी गाटीया याला सापळा रचून पकडले. त्यानंतर आरोपीस कोरेगाव पार्क येथील गुन्ह्यात वर्ग करुन ताब्यात घेण्यात आले. ही कामगिरी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहायक पोलीस निरीक्षक जयवंत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

# बसमध्ये चोऱ्या करणाऱ्याला अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरातील विविध भागांत पीएमपी बस स्थानकात गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशांचा ऐवज चोरणाऱ्याला गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून ६७ हजारांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

सचिन सिधराम गायकवाड (रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याने यापूर्वी पाच गुन्हे केल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात पीएमपीमध्ये प्रवाशांचा मौल्यवान ऐवज चोरीचे प्रमाण वाढले होते. त्यानुसार गुन्हे शाखेची पथके गस्त घालत होती. त्यानुसार मिळालेल्या माहितीवरून गायकवाड याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने चार गुन्हे केल्याचे समोर आले आहे.

## पादचारी महिलेचा मृत्यू

पुणे : बाणेर रस्त्यावरील परफेक्ट स्माइल क्लिनिकसमोर भरधाव कारची धडक बसून, पादचारी महिला ठार झाली. या प्रकरणी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीराबाई मिश्रीलाल नुकूम (वय ४८, रा. बाणेर) असे ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी मिश्रीलाल नुकूम (वय ४९, रा. बाणेर) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार कारचालक महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चतुःश्रृंगी पोलिस अधिक तपास करत आहेत.

## क्राइम डायरी

### अर्भक आढळले

उत्तमनगर येथील स्मशानभूमीजवळील मुळा नदीच्या पात्रात पुरुष जातीचे नवजात अर्भक सापडले. या प्रकरणी उत्तमनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुनील धावडे (वय ३४, रा. उत्तमनगर गावठाण) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, अनोळखी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रिक्षाचालक आहेत. बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास उत्तमनगर स्मशानभूमीजवळून ते जात होते. त्या वेळी त्यांना मुळा नदीपात्रात एक नवजात अर्भक असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ही माहिती पोलिसांना दिली. उत्तमनगर पोलिसांनी अर्भकाला तत्काळ रुग्णालयात दाखल केले.

### ज्येष्ठ महिलेची बांगडी चोरीस

वनाझ ते वैदुवाडी दरम्यान पीएमपी प्रवासात एका ज्येष्ठ महिलेच्या हातातील ९० हजार रुपये किमतीची सोन्याची बांगडी चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५९ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला गृहिणी असून, २५ डिसेंबरला त्या वनाझ ते वैदुवाडी या मार्गावर पीएमपी बसने प्रवास करत होत्या. त्या वेळी चोरट्याने त्यांची बांगडी चोरली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ६ जानेवारी, २०२०

# वाहतूक पोलिसाशी वाद घालणाऱ्याला अटक

**रामवाडी परिसरातील घटना**

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

रस्त्यावर बेकायदा पद्धतीने उभी केलेली चारचाकी उचलून घेऊन जात असताना वाहतूक कर्मचाऱ्यांशी वाद घालून अरेरावी करणे वाहनचालकाला चांगलेच महागात पडले आहे. वाहतूक कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केल्याने सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी पोलिसांनी संबंधित वाहनचालकावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

शेवराव लक्ष्मण यादव (वय ३४, रा. विकफिल्ड झोपडपट्टी, रामवाडी) असे अटक करण्यात आलेल्या वाहनचालकाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस हवालदार अंकुश सर्जेराव जगदाळे (वय ५४) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जगदाळे हे येरवडा वाहतूक विभागात नोकरीला आहेत. शनिवारी सकाळी जगदाळे हे क्रेनवर दोन हेल्परसोबत कामावर होते. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास विकफिल्ड झोपडपट्टीसमोर नगर रस्त्यावर यादव यांनी चारचाकी मोटार बेकायदा पद्धतीने पार्कींग केली होती. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता.

जगदाळे यांनी क्रेनने मोटारीला उचलून घेऊन जात असताना यादव घटनास्थळी आला. त्याने 'तू काम कसे करतो बघतोच,' अशी अरेरावी करून आंदोलन करून रस्ता अडविण्याची धमकी दिली. त्यामुळे जगदाळे यांनी सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. यानंतर येरवडा पोलिसांनी शनिवारी रात्री आरोपीला अटक केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १० जानेवारी, २०२०

# छेड काढणाऱ्या दोघांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे



**क्राइम डायरी**

थर्टी फर्स्ट साजरा करून पतीसोबत दुचाकीवरून घरी निघालेल्या महिलेचा कारने पाठलाग करून विनयभंग करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. टुर्स व ट्रॅव्हल्स कंपनीला भाडेकरारावर दिलेल्या कारच्या चालकाने मित्रांना सोबत घेऊन हा प्रकार केल्याचे समोर आले आहे.

ज्ञानेश्वर राधाकिसन राक्षे (वय २०, रा. साई पार्क सोसायटी, लोहगाव), अजय मधुकर मिसाळ (वय २२, रा. डी. वाय. पाटील रस्ता, लोहगाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्या दोन साथीदारांचा शोध सुरू आहे. मिसाळ इंजिनीअरिंगचा विद्यार्थी असून, फरारी आरोपी इंजिनीअरिंगचे विद्यार्थी आहेत. या प्रकरणी उंड्री परिसरातील १९ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. तक्रारदार महिला व तिचा पती थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी कॅम्प परिसरात आले होते. त्यानंतर पहाटे दोनच्या सुमारास ते दुचाकीवरून परत घरी निघाले होते. एनआयबीएम चौकातून ते उंड्रीकडे दुचाकीवरून जात असताना एका कारमधून चार अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या दुचाकीचा पाठलाग सुरू केला. आरडाओरडा करीत महिलेच्या चालत्या कारमधून जवळ येऊन आरोपी तिच्या अंगाला हात लावू लागले. त्यामुळे तक्रारदार महिला व तिचा पती घाबरले. महिलेने तिच्या दिराला फोन करून कारमधील व्यक्ती पाठलाग करून त्रास देत असल्याचे सांगितले. महिलेचा दीर आल्यानंतर आरोपी पळून गेले होते. मात्र, निघून जाताना आरोपींनी कार दिराच्या अंगावर घातली. यात त्यांच्या पायाला जखम झाल्याने ते जखमी झाले.

या प्रकरणी स्थानिक पोलिस व गुन्हे शाखेचे पोलिस तपास करीत होते. अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे, सहायक आयुक्त विजय चौधरी यांनी गुन्ह्याचा छडा लावण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक दत्ता चव्हाण यांनी कारच्या क्रमांकावरून आरोपींचा शोध सुरू केला. त्या वेळी टुर्स व ट्रॅव्हल्ससाठी ही कार भाडेतत्त्वावर दिली असल्याचे आढळून आले. कारमालकाची माहिती घेण्यात आली. त्यानंतर त्यांच्याकडे जाऊन चौकशी केली असता घटनेच्या वेळी राक्षे गाडी घेऊन गेल्याचे समजले. त्याचे तीन मित्र इंजिनीअरिंगचे विद्यार्थी असल्याचे उघड झाले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्ह्यातील कार जप्त केली आहे.

**विवाहितेचा छळ**

विवाहितेचा शारीरिक, मानसिक छळ करून मारहाण करणाऱ्या महिलेच्या पती आणि सासूच्या विरोधात कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी ३० वर्षीय महिलेने तक्रार दिली असून, त्यावरून पोलिसांनी पती मोसिन इसाक शेख, तस्लीम इसाक शेख यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार महिलेला तिच्या सासरच्या लोकांकडून अनेक लहानमोठ्या कारणांवरून शारीरिक त्रास करण्यात येत होता. तिला नांदविण्यासही ते तयार नव्हते. महिलेला शिवीगाळ करून तिच्या पतीने आणि सासूने तिला मारहाणही केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि.२४जानेवारी, २०२०

# दरोड्याच्या तयारीतील पाच जणांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना हडपसर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, यात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. हडपसर येथील साडेसतरा नळी भागातून बुधवारी पहाटे ३.३० वाजता या सर्वांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून कोयता, पालघन अशी हत्यारे; तसेच कटावणी, नायलॉन दोरी, मिरची पूड, दुचाकी असे दरोड्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी पुणे शहरात प्रतिबंधात्मक आदेश काढले आहेत. या आदेशानुसार दगड, शस्त्रे; तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरली जाणारी कोणतीही वस्तू जवळ बाळगण्यास बंदी आहे. हडपसर, साडेसतरानळी परिसरात असलेल्या भागीरथीनगर येथील मोकळ्या मैदानाजवळ काही युवक थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीतच्या आधारे शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी तेथे भेट दिली असता तेथे हे आरोपी आढळून आले.

योगीराज पानसरे (वय २०, रा. काळुबाई वसाहत, माळवाडी हडपसर), दिनेश राखपसारे (१९, रा. फुले वस्ती, मांजरी) आणि सोमनाथ चौधरी (१८, रा. धारवडकर कॉलनी, मांजरी बुद्रुक) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. यांच्यासह पोलिसांनी त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्या विरोधात पोलिस शिपाई विनोद शिवले यांनी तक्रार दिली असून, हडपसर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना मदत करणाऱ्या इतर साथीदारांचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. या आरोपींकडे कोयता, लोखंडी कटावणी, मिरची पूड यांसह दुचाकी असा ३० हजार ४०० रुपयांचा ऐवज मिळाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक निरीक्षक एस. डी. चव्हाण करीत आहेत.

पुढारी – दि. ५ जानेवारी, २०२०

# आमिषातून ज्येष्ठांना फसवणाऱ्यांना अटक

पुणे : प्रतिनिधी

सोन्याचे बिस्कीट देण्याच्या बहाण्याने पिवळसर रंगाच्या धातूचा तुकडा हवाली करत महिलांचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीतील दिलीप विश्वनाथ जाधव ऊर्फ स्वामी (४८) आणि रणजित दिलीप जाधव ऊर्फ स्वामी (२३ दोघेही रा. फिरस्ता मूळ रा. लातूर) या दोघांना हडपसर पोलिसांनी अटक केली.

२६ डिसेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास दोन अनोळखी व्यक्तींने रस्त्याने जाणाऱ्या वयस्कर महिलेशी संवाद साधत त्यांच्याकडील एक पिवळसर रंगाच्या धातूचे बिस्किट सोन्याचे असल्याचे सांगून ते देण्याचे आमिष दाखविले. या अमिषाला अनेक महिलाही बळी पडल्या. त्यानंतर ते हडपसर येथील गाडीतळाच्या मागील बाजूस असलेल्या पीएमपीएल बसस्टॉपच्या मागे घेऊन गेले. तेथे त्यांनी महिलेची सोन्याची माळ काढून घेत तिची फसवणूक केली.

दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करीत असताना कर्मचारी नितीन मुंढे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती की, दोघे जण पीएमपीएल स्टॉपजवळ थांबून वयस्कर महिलांजवळ सोन्यासारखे दिसणारे धातूचे बिस्कीट दाखवून त्यांना बाजूला घेऊन त्यांच्याबरोबर बोलून फसवणूक करत आहेत. त्यानुसार घटनास्थळी जाऊन पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांची तपासणी केली असता, त्यांच्याकडून सोन्यासारखा दिसणारा पिवळसर रंगाचा धातू मिळाला. त्यानुसार दोघांनी यापूर्वी हडपसर पोलिस ठाण्यातील दाखल गुन्ह्यातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. अपर पोलिस आयुक्त सुनिल फुलारी, पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलिस निरीक्षक हमराज कुंभार, सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, प्रसाद लोणारे,उपनिरीक्षक जोशी, कर्मचारी संपत औचरे, नितीन मुंढे, रमेश साबळे, राजेश नवले, गणेश दळवी, सैदोबा भोजराव, विनोद शिवले यांच्या पथकाने केली.

लोकमत – दि. २४ जानेवारी, २०२०

# वेश्याव्यवसायास प्रवृत्तप्रकरणी चार अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पैशाचे आमिष दाखवून दोन तरुणींना वेश्याव्यवसाय करण्याकरिता प्रवृत्त करणाऱ्या चार जणांना भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्यांची २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

याप्रकरणी विशाल अशोक देशमुख (वय ३६, रा. दत्तवाडी), संतोष रघुनाथ दारवटकर (वय ४१, रा. नवी पेठ), राजन नारायण सावंत (वय ४५, रा. धनकवडी), मुन्ना उर्फ लक्ष्मण विजय आहेर (वय २४, रा. गवळी वाडा) अशी अटक केलेल्या व्यक्तींची नावे आहेत. याबाबत पोलीस शिपाई पुष्पेंद्र देवदास चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे. २१ जानेवारी रोजी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास हॉटेल किनारा याठिकाणी ही घटना घडली. या घटनेत रोख चार हजार रुपये, २१ हजार रुपये किमतीचे ७ मोबाईल, एकूण २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

परराज्यातील तरुणींना पैशाचे आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करताना आरोपींना पकडल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. त्यांचे अन्य साथीदारांचा शोध घेणे, अन्य कुठल्या तरुणींना फसवले आहे का? याचा तपास करण्याकरिता पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

पुढारी – दि. १८ जानेवारी, २०२०

# गांजा तस्करांवर पोलिसांची कारवाई

## विविध ठिकाणी चौघांना अटक

पुणे : प्रतिनिधी

शहरात गांजाची तस्करी केल्याप्रकरणी पुणे शाखा व स्थानिक पोलिस ठाण्यांच्या पथकाने सिंहगड रोड, विश्रांतवाडी, वानवडी परिसरातील चौघांना ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून एक लाख रुपये किमतीचा पाच किलो गांजा जप्त केला. यामध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

सिंहगड रस्ता परिसरातील शिंदे खुर्द भागात नेहा प्रकाश पवार (४८, रा. शिंदे खुर्द) ही महिला गांजा विक्री करीत असल्याची माहिती अंमली पदार्थ व खंडणी विरोधी पथक पुर्व विभाग यांच्या पथकास मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास सापळा लावून एक महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडील बॅगची झडती घेतली असता २२ हजार २०० रुपयांचा १ किलो ११० ग्रॅम गांजा आढळून आला. याबाबत महिलेच्या विरुद्ध सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पश्चिम विभाग पथकाने विश्रांतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत [illegible] रोड तुळजाभवानी नगर येथून अनिल बाजीराव सातारकर (३५, रा. लक्ष्मी नगर, काझी चौक, कोंढवा खुर्द) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे दीड वजनाचा गांजा आढळून आला. तसेच वानवडी पोलिस ठाण्याच्या पथकाने येथील सय्यदनगर गल्ली क्र. २ येथे दुचाकीवरून निघालेल्या रिझवान महमद नजीर (२६), आणि सलमान कलीम खान (२० दोघे रा. हांडेवाडी रोड हडपसर) यांना संशयावरून ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांच्याकडे असलेल्या पांढऱ्या रंगाच्या पोत्याची झडती घेतली असता त्यामध्ये २ किलो ३२१ ग्रॅम गांजा मिळून आला. यावेळी पोलिसांनी गांजासह गुन्ह्यात वापरलेली दुचाकीदेखील जप्त केली.

## गावठी दारू विक्री; हमालाला कारावास

**पुणे :** गावठी दारू विक्रीप्रकरणी निलेश गणेश कसबे (वय २२, रा. गंज पेठ) या हमालास न्यायालयाने तीन वर्षे साधी कैद व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. के. खराडे यांच्या न्यायालयाने सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त तीन महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. याबाबत राज्य उत्पादक शुल्क विभागाचे बी. ए. कांडेकर यांनी फिर्याद दिली आहे.

ही घटना २ ऑगस्ट २०१४ रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास गंज पेठ परिसरात घडली. निलेश हा गंज पेठ परिसरात आला असून, त्याकडे गावठी दारू असल्याची माहिती राज्य उत्पादक शुल्क विभागाच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचत त्याला ताब्यात घेत झडती घेण्यात आली. यावेळी त्याच्याकडे तीस लिटर गावठी दारूचा एक व दहा लिटर गावठी दारूचे दोन कॅन आढळून आले. याप्रकरणी त्याला अटक करत त्याविरोधात दाखल करण्यात आले होते.